नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 06/09/2023 (बुधवार) सकाळ

---

## दुखापत

**पो.स्टे. मौदा** :– अंतर्गत २२ कि. मी. अंतरावरील कोटगाव ता. मौदा जि. नागपुर येथे दिनांक ०५/०९/२०२३ चे ०८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– राजु नागो शेलारे, वय २९ वर्ष रा. कोटगाव ता. मौदा जि. नागपुर याने आपल्या मुलाला आंघोळ करण्याकरीता नेले असता तिथे आरोपी नामे –रमेश श्रावण शेलारे, रा. कोटगाव ता. मौदा जि. नागपूर हा फिर्यादीच्या वडीलांना म्हणत होता की तुम्ही शेताच्या धुऱ्यावर तुरी का लावल्या या कारणावरून भांडण करीत होता तेव्हा फिर्यादीने आपल्या वडीलांना म्हटले की तुरी मोडतो म्हणते तर मोडु दया तुम्ही भांडण करू नका असे म्हटले असता तरी पण रमेश यांनी तुला मारून टाकीन असे म्हटले असता तेव्हा मार बर म्हटले तेव्हा आरोपीने फिर्यादी सोबत शिविगाळ करून घरातुन काठी घेउन आला व फिर्यादीला मारत असता फिर्यादीने काठी हिसकावुन घेतली तेव्हा आरोपीने जमीनीवरचा कॉक्रेटचा गोटा उचलुन फिर्यादीचे डावे कानावर मारला त्यामुळे काणातुन रक्त निघाले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार मेश्राम मो. नं. ९८२२५४५१६९ हे करीत आहे.

## जबरी संभोग

**पो.स्टे. कळमेश्वर** :– दिनांक ०२/०९/२०२३ चे ११.०० वा. ते १४.०० वा. सुमारास यातील आरोपी नामे– प्रविण रामचंद्र बाराई, वय २७ वर्ष रा. सावळी पोस्टे पिपळा ता. कळमेश्वर जि. नागपुर याने फिर्यादीची अल्पवयीन मुलगी वय १७ वर्ष हिला लग्नाचे व प्रेमाचे आमीष दाखवुन तिचे सोबत वेळोवेळी जबरीने शारीरीक संबध प्रस्थापीत केले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३७६(२), (जे) ३७६(२), (एन) भादवी सहकलम ४, ६ पोस्को अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक प्रियंका गेडाम मो. नं. ९५०३९७३६५७ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**